असुधारित प्रत

महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७
(सकाळी १०.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

(क) **अल्पसूचना प्रश्न**

"दौंड (जि.पुणे) येथील बिरोबाचीवाडी येथे बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान होत असल्याबाबत" या विषयावरील श्री.राहुल कुल, वि.स.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक ८४७२७.

(ख) **तारांकित प्रश्न.**

(ग) **तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(१) **आदिवासी विकास मंत्री** : "अकोले (जि.अहमदनगर) या आदिवासी तालुक्यात रस्त्याची कामे व विद्युतीकरण झालेले नसल्याबाबत" या विषयावरील श्री.वैभव पिचड, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६२३७१ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **ऊर्जा मंत्री** : "सावर्डे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे महावितरणची तार गळ्यात अडकून एका दुचाकीस्वाराचा झालेला मृत्यू" या विषयावरील श्री.सदानंद चव्हाण, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८३३७० ला दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(घ) **दिनांक १४ मार्च, २०१७, २० मार्च, २०१७, २१ मार्च, २०१७ व ३ एप्रिल, २०१७ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(ङ) **अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २८६ ते २९२ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

दोन : शोक प्रस्ताव -

डॉ.पांडुरंग विठुसा ढोले, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१)	**वित्त आणि नियोजन मंत्री** :	(क)	भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे (१) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल, व (२) आर्थिक क्षेत्रावरील अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
		(ख)	भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा सार्वजनिक उपक्रम अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(२)	**शालेय शिक्षण व क्रिडा आणि अल्पसंख्याक विकास मंत्री** :	(क)	महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (दुसरी सुधारणा) नियमावली, २०१७ अधिसूचना क्रमांक एमईपी, २०१५/ प्र.क्र.३२५/ टीएनटी-१. दिनांकित १५ मार्च, २०१७ सभागृहासमोर ठेवतील.
		(ख)	मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(३)	**जलसंपदा मंत्री** :		महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल आणि अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(४)	**उद्योग मंत्री** :		महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(५)	**ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**	:	(क) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
			(ख) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

चार : लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे -

ग्रामविकास मंत्री : "राज्यात जिल्हा परिषदांमार्फत राबविलेल्या शासनाच्या अनेक योजनांमधील कोटयवधी रुपये अडकून असणे" या विषयावरील सर्वश्री. विरेंद्र जगताप व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २२ मार्च,२०१६ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

पाच : लोकलेखा समितीचा एकोणिसावा व विसावा अहवाल सभागृहास सादर करणे.

सहा : विनंती अर्ज सभागृहास सादर करणे :-

श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स. : **"मौजे वैरागड, ता.चिखली जिल्हा बुलढाणा येथील संग्राहक तलावाचे काम सुरु होण्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

सात : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती जाहीर करणे.

आठ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

नऊ : (अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाकूर संकुल, लोखंडवाला संकुल, ठाकूर गाव व आजूबाजूच्या परीसरातून कांदिवली पूर्व स्थानकाकडे येण्यासाठी केवळ आकुर्ली रोड हा एकच रस्ता असणे, बाणडोंगरी मधून निघणारा डी.पी. रोड, कांदिवली स्थानकालगत असलेला महादेव देसाई डी.पी. रोड, ठाकूर गाव ते लोखंडवाला संकुल मधील डी.पी. रोड इ. प्रस्तावित रोड मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात नसणे व काही रस्त्यांवर अतिक्रमण असणे, त्यामुळे दररोज वाहतुकीची मोठी समस्या स्थानिक रहिवाशांना सहन करावी लागत असणे, त्यामुळे गत ५ वर्षात २ नागरिकांचा वाहतूक कोंडीमुळे रुग्णालयात जात असतानाच हृद्यविकाराच्या झटक्याने झालेला मृत्यू, त्यामुळे स्थानिक नागरिक व रहिवाशांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे सदरच्या परिसरातून स्थानकाकडे येण्यासाठी काही रस्त्यांचे रुंदीकरण करण्याची तसेच अनधिकृत अतिक्रमण हटविण्याची व विकास नियोजन (डी.पी.) मध्ये असलेले प्रस्तावित रस्ते ताब्यात घेऊन बनविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनीषा चौधरी, स्नेहलता कोल्हे, सर्वश्री प्रशांत ठाकूर, शिरीष चौधरी, तान्हाजी मुटकुळे, ॲड. संजय धोटे, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्षवेधतील :-**

"वाशी येथील नवी मुंबई महानगरपालिका दिव्यांग प्रशिक्षण केंद्रामध्ये (ETC) मोठ्या प्रमाणात झालेला आर्थिक गैरव्यवहार, सदर गैरव्यवहाराच्या तक्रारीची चौकशी करण्याची लेखी मागणी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी करणे, दिव्यांग प्रशिक्षण केंद्रासाठी आजतागायत खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची महापालिकेला माहिती नसणे, केंद्रातील फर्निचर, विद्यार्थ्यांचे कपडे, खाऊ तसेच इतर साहित्य खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार, केंद्रामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येत तफावत असणे, ई.टी.सी. केंद्रातील संचालकांना कोणताही अधिकार नसताना केलेली खरेदी व त्यांत झालेला मोठा गैरव्यवहार, केंद्रातील 'संचालक' हे पदच अस्तित्वात नसताना संचालक पदावर झालेली नियमबाह्य नियुक्ती, नवी मुंबई महापालिकेमार्फतही शासनाला दिलेला चुकीचा अहवाल, भ्रष्टाचारामुळे नागरिकांत व अधिकारी-कर्मचारी वर्गात पसरलेला असंतोष, केंद्रातील शिक्षकांचा होणारा मानसिक छळ तसेच ई.टी.सी. केंद्रासंदर्भात महापालिका मुख्य लेखा परीक्षक

यांनी उपस्थित केलेले लेखा आक्षेप या सर्व गैरव्यवहाराची निवृत्त न्यायाधीशांमार्फत सखोल चौकशी करण्याची लोकप्रतिनिधीनी केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **डॉ अनिल बोंडे, डॉ सुनिल देशमुख, श्री रमेश बुंदिले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"वरुड (जि.अमरावती) येथील आदिवासी भागात ख्रिश्चन धर्म प्रचारकांकडून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व ग्राम गीताचार्य श्री तुकारामदादा यांचे छायाचित्र वापरून नागरिकांना धर्मपरिवर्तन करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, ग्रामीण भागातील नागरिकांना येशू ख्रिस्त व बायबल मधील विचार हे राष्ट्रसंत तुकडोजी महराज व गीताचार्य श्री.तुकारामदादा यांचे विचार असल्याचे भासवून ख्रिश्चन धर्म प्रचारकाने ख्रिस्त भक्त मंडळी, गुरुदेव सेवा मंडळ, सत्यशोधक समाज अशा नावाने प्रार्थना पुस्तिका प्रकाशित करून वितरीत करणे, ख्रिस्ती धर्मप्रचारक हिंदू देवदेवतांची निंदा करून हिंदुच्या मूर्तीपूजेविषयी अत्यंत अश्लील भाषेचा वापर करीत असल्यामुळे या धर्म प्रचारकांविषयी सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, ख्रिस्ती धर्माच्या प्रचाराच्या नावाखाली देशामध्ये हिंदू धर्माच्या लोकांना विविध प्रलोभने दाखवून तसेच हिंदू संतांच्या विचारांना येशूचे विचार असल्याचे दाखवून गरीब जनतेला फसवण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरु असणे, राज्य शासनाने तातडीने या प्रार्थना पुस्तिकेचे वितरण करणा-या धर्माप्रचारकांवर तसेच धर्मांतराचे काम करणा-या संस्थांवर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(४) **श्री. शरद सोनावणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जॉली अनिल इंडिया लि., ऑलंपिया सेंट्रल एव्हेन्यु, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई (मुंबई) यांना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी पाठविलेल्या नोटीशीवर संबंधीत कंपनीने कोणताही निर्णय न घेतल्याने गेली ३० वर्षे रु.१,०२२,५३ प्रतीवर्षी नुसार होणारी रक्कम व्याजासह वसूल का करु नये तसेच आतापर्यंत भाडेपट्टयाचे सुमारे १४ ते १५ कोटी रुपये शासनाला भरणेबाबत तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशी नोटीस दिल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये निदर्शनास येणे, करारातील अटी व शर्तीप्रमाणे जमिनीचा मूळ प्रयोजनासाठी आत्तापर्यंत वापर न केल्याने सदर जमीन शासनजमा का करण्यात येऊ नये असाही नोटीशीत केलेला उल्लेख, संबंधीत कंपनीने शासनाच्या परवानगीशिवाय ओएनजीसी कंपनीस ७ एकर ३४ गुंठे जमीन वेअर हाऊसिंग करीता

प्रती महिना १,३६,३३७/- रुपये पोट भाडयाने देणे, पोट भाडयावरील ७५ टक्के रक्कम शासनाला अदा न करणे, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी वारंवार जागा मिळणेबाबत व भाडेपट्ट्यांची रक्कम थकित असल्याचे निदर्शनास आणून देऊनही त्याकडे कंपनीच्या मालकांनी व संचालकांनी हेतुत: केलेले दुर्लक्ष, सदर कंपनीकडून पोटभाड्याची ७५ टक्के रकमेची तसेच करारानुसार होणाऱ्या वार्षिक भाडेपटट्याच्या रक्कमेची गेली २५ ते ३० वर्षे वसूल करण्यास जिल्हाधिकारी व महसुल विभागातील संबंधीत अधिकारी यांचे कंपनीने व्यवस्थापकांशी असलेल्या आर्थिक हितसंबंधामुळे त्यांनी केलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **श्री प्रकाश आबिटकर वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील शालेय पोषण आहाराचे साहित्य वितरणाचे काम गत अनेक वर्षापासून महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य कन्झुमर फेडरेशन यांचेमार्फत सुरु असणे, या कामामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने शासनाने गत २ वर्षापासून शालेय पोषण आहार वितरणाचे काम जिल्हास्तरीय करण्याबाबतचे आदेश देणे, शालेय पोषण आहाराचे काम जिल्हस्तरावरील ठराविक कंत्राटदाराला देण्यासाठी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी किचकट नियम व अटीचा समावेश करून लहान ठेकेदारांना या स्पर्धेमधून कमी करण्याचे नियोजनबध्द केलेले काम, गत अनेक वर्षापासून पोषण आहार वितरणाचे काम महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य कन्झुमर फेडरेशन मार्फत सुरु असल्याने या कामामध्ये अनियमितता असल्याचे निदर्शनास येणे, या शिखर संस्थाच्या माध्यमातून सहकरी संस्थामार्फत काम करणे अपेक्षित असताना ते न करता खाजगी कंत्राटदारामार्फत काम करीत असल्याने सहकार अधिनियमांचा होत असलेला भंग, परिणामी या शिखर संस्थांची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री.सुभाष भोईर, नरेंद्र पवार, गणपत गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील २७ गावांना गत दोन वर्षांपासून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध न होणे, शहरातील पाणी समस्या सोडविण्यासाठी शासनाने कल्याण डोंबिवली शहराकरिता १४० एमएलडी, बारवी धरणातील अतिरिक्त पाणी तसेच मोरबे धरणातून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राकरीता एमआयडीसीच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी न

होणे, २७ गावांना पुरेसा पाणीपुरवठा करुन देण्यासाठी जलसंपदा विभागाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये दहा टक्के अतिरिक्त पाणीपुरवठा मंजूर करणे, परंतु लघु पाटबंधारे विभागाने एमआयडीसीच्या पाणी उचलण्यावर निर्बंध घातल्याने ग्रामीण भागात निर्माण झालेली पाणी टंचाई, एमआयडीसीला उल्हास नदीतून केवळ ६४० एम.एल.डी. पाणी मिळत असल्याने एमआयडीसीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा न होणे, याबाबत नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी करूनही २७ गावांच्या पाणीपुरवठ्यात वाढ न होणे, ग्रामीण भागात एमआयडीसीकडून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना तब्बल १३० एम.एल.डी. पाणी पुरवठा कमी केल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली गैरसोय, या गावांतील नागरीकांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुरवठा आरक्षित करण्याची केलेली मागणी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील २७ गावांमधील पाणी समस्या सोडविण्यासाठी शासनाची तातडीची भूमिका व उपाययोजना."

(७) **श्री.शंभूराज देसाई, ॲड.राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पाटण जि.सातारा मधील कृष्णा खोरे विकास महामंडळाअंतर्गत मोरणा-गुरेघर मध्यम धरण प्रकल्पाचे काम सध्या पूर्णत्वाकडे गेले असून सदर धरणामध्ये पुर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येणे, या धरण प्रकल्पाअंतर्गत या विभागातील शेतीकरीता कालव्याच्या माध्यमातून पाणी देण्याकरीता धरणाच्या डाव्या व उजव्या अशा दोन्ही बाजूचे सर्वेक्षण करुन धरण प्रकल्पाचे डाव्या व उजव्या तीरावरुन कालव्याच्या कामास सुरुवात करण्यात येणे, तथापि, धरणाच्या दोन्ही कालव्यांच्या कामांचे सर्वेक्षण हे चुकीचे झाले असल्याने कालव्यातील पाणी डोंगरकडेला वसलेल्या अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेतीला मिळत नसणे, परिणामी दोन्ही तीरांवरील कालव्यांच्या कामांना स्थगिती देऊन या विभागातील शेतक-यांच्या शेतीला इरिगेशनच्या (उपसा सिंचन योजना) माध्यमातून पाणी देण्याच्या कामांना मंजूरी देण्याबाबत शासनाकडे मागणी केली असता शासनाने या कामांचे फेर सर्वेक्षण करण्याचे आदेश कार्यकारी संचालक कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना देऊनही त्याकडे केलेले दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री. सुधाकर देशमुख, सुधाकर कोहळे, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, उन्मेश पाटील, संजय सावकारे, श्रीमती संगीता ठोंबरे, सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल शिंदे, राजन साळवी, ॲड. भीमराव धोंडे, डॉ.अनिल बोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उर्जा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महावितरण कंपनीने महसुली तुट भरुन काढण्यासाठी राज्य वीज नियामक आयोगाकडे वीज दरवाढीचा प्रस्ताव दाखल केल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, महावितरण कंपनीचे औद्योगीक दर इतर राज्यांच्या तुलनेने किमान ३५ ते ५० टक्के जास्त असून ३०० युनिटच्या वरील घरगुती वीज ग्राहकांचे दर दुप्पट ते अडीच पट असणे, शेतकऱ्यांना आकारण्यात येण्यारे दर इतर राज्याच्या तुलनेत अधिक असतांना देखील महवितरण कंपनीने सरासरी १९ ते २७ टक्के दरवाढीचा प्रस्ताव दाखल करणे, सदर प्रस्तावात तीन वर्षात २४ हजार कोटी रुपयांची मागणी करण्यात येऊन ती मान्य झाल्यास ग्राहकांना सरासरी १२ % वीज दरवाढीचे संकट येणे, सदर २४ हजार कोटीमध्ये सर्वात मोठा वाटा रु. १० हजार कोटी हा प्रशासकीय देखभाल दुरुस्ती खर्चाचा असणे, महावितरणाने सद्यस्थितीत प्रशासकीय देखभाल दुरुस्तीच्या खर्चापोटी ६५ पैसे प्रति युनिटची मागणी केलेली असणे, महानिर्मिती कंपनीचा प्रचंड उत्पादन खर्च, मोठ्या प्रमाणावरील वीज गळती, प्रशासकीय खर्च व भ्रष्टाचार ही कारणे वीज दरवाढीस जबाबदार असणे, वीज गळतीकडे महावितरणने दुर्लक्ष केल्याने दरवर्षी ग्राहकांची सरासरी आठ हजार कोटीची होत असलेली लुट, उक्त नुकसानकारक बाबीकडे लक्ष न देता वीज दरवाढ प्रस्तावित करणे, परिणामी वीज ग्राहक तसेच, औद्योगिक वीज ग्राहक व शेतकरी वर्ग नाहक भरडला जाणे, याप्रकरणी वीज ग्राहकात निर्माण झालेला असंतोष, त्यामुळे महावितरणने प्रस्तावित केलेली वीज दरवाढ तातडीने रद्द करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

(९) **सर्वश्री. किसन कथोरे, संदीप नाईक, संजय केळकर, बळीराम सिरसकर, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वैभव पिचड, प्रदीप जाधव-नाईक, पांडुरंग बरोरा, सुनिल प्रभू, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, हनुमंत डोळस, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, सुधाकर कोहळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे व नागपूर शहरातील प्रादेशिक मनोरुग्णालयात नागपूर जिल्ह्यासह विदर्भ, मध्यप्रदेश, छत्तीसगढ राज्यातून हजारोंच्यावर मनोरुग्ण नियमित उपचाराकरिता येत असणे, या मनोरुग्णालयात दिवसेंदिवस वाढत असलेली मनोरुग्णांची संख्या लक्षात घेता त्याकरिता कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी, मानसोपचार तज्ज्ञ, डॉक्टर, परिचारिका, अटेन्डंट, तंत्रज्ञ, रुम बॉय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असणे, रुग्णालयातील मंजुर रिक्त पदांना अद्यापपर्यंत मंजुरी मिळाली नसणे, तसेच मनोरुग्णालयाच्या कामाकरीता शासनाचा निधी अपुरा पडत असणे, अनेकदा ओलोन्झापीन व हॉलो पेरोडॉल या

सारख्या आवश्यक औषधांच्या साठ्यात तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत असणे, या मनोरुग्णालयात उपचाराकरिता भरती असलेल्या रुग्णांना कर्मचारी व अधिकारी असभ्य वागणूक देत असणे, मागील सात माहिन्यात २१ मनोरुग्ण रुग्णालयात उपचारादरम्यान गळफास लावून, गळा दाबून, इ. कारणांनी मृत्यु पावल्याच्या घटना उघडकीस येणे, त्यामुळे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, अटेंन्डंट तसेच अन्य कर्मचाऱ्याबद्दल निर्माण झालेला संशय, अशा दोषी कर्मचाऱ्यांच्या कामाची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याची तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्वरीत निलंबित करण्याची गरज, मनोरुग्णालयाच्या प्रशासन व शासनाद्वारे मनोरुग्णालयातील अनेक वर्षापासूनची आवश्यक मंजूर रिक्त पदे तातडीने भरण्याची गरज, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

दहा : (१) श्री.सुधाकर देशमुख,मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव :-

श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी "अमरावती महानगरपालिका क्षेत्राकरिता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाच्या राज्यस्तरीय मंजुरी व सनियंत्रण समितीकडे ७०१८ घरकुलांचा प्रस्ताव सादर करताना या योजने संदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना क्र. ८.६ नुसार स्थानिक विधानसभा सदस्य डॉ.सुनिल देशमुख यांच्याशी विचारविनिमय करुन या योजनेच्या लाभार्थ्यांची यादी घोषीत करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य यांचे मत विचारात न घेतल्याने, या प्रक्रियेमध्ये सन्माननीय सदस्य यांना सहभागी करुन न घेतल्याने व त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य लोकांना देत असलेली माहिती चुकीची असून व योजनेला अंतिम मंजुरी देण्याचे अधिकार राज्य शासनाचेच असल्याचे वृत्तपत्रात जाहीर करुन सन्माननीय सदस्यांच्या भुमिकेचे खंडन करीत सन्माननीय सदस्यांची प्रतिमा जनमानसात मलिन केल्याने उद्‌भवलेल्या सन्माननीय सदस्य व महाराष्ट्र विधानसभेच्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणासंबंधातील विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा."

(२) मा.मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव :-

सन्माननीय विधानसभा सदस्य डॉ.सुनिल देशमुख यांनी श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणासंबंधातील विधानसभा विशेषाधिकार समितीचा अहवाल

विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदर अहवालातील निष्कर्षांशी सहमत असून असा ठराव करीत आहे की, श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांना सन्माननीय विधानसभा सदस्यांचा पर्यायाने सभागृहाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अवमान केल्याबद्दल वा अवमान घडून येईल अशी परिस्थिती उद्‌भवेल अशी कृती वा अकृती केल्याबद्दल सभागृहाचे न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी.

अकरा : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र शेतजमीन पट्ट्याने देण्याबाबत विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ — महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतिबंध) विधेयक, २०१७.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र शेतजमीन पट्ट्याने देण्याबाबत विधेयक, २०१७.

---

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ — महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतिबंध) विधेयक, २०१७.

(क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ यात विधानपरिषदेने केलेल्या सुधारणांना सहमती देणे.

अशासकीय कामकाज

(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

बारा : अशासकीय विधेयके :-

(अ) पुर:स्थापनार्थ :

सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(ब) विचारार्थ :

(शनिवार, दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु, पुढे ढकलण्यात आलेले विधेयक -

सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

तेरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-

(दिनांक २४ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले तथापि, चर्चा न झालेला अशासकीय ठराव) (क्रमांक १)

(१) **डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २००**

"राज्यात शहरी तसेच ग्रामीण भागात महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने गावात महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक महिला स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत.) (क्रमांक २ ते ४)

(२) **श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २८७**

"दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या

रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ५०,०००/- इतकी वाढविण्याची गरज निर्माण होणे, त्यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३) **श्री. राजन साळवी, वि.स.स. यांचा ठराव क्र. २३८**

"कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची होत असलेली मागणी लक्षात घेता, मुंबई विद्यापीठाचे विभाजन करुन रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या तीन जिल्हयातील सुमारे १३० महाविद्यालयांकरिता एक स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करावे"अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री. संजय कदम, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५५**

"कोकणातील सर्व पर्यटन स्थळांचा व तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी त्याचप्रमाणे पर्यटकांसाठी व भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊन त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमणे, स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी तसेच या सर्व पर्यटन व तीर्थक्षेत्राचे महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

" राष्ट्रगीत "

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ६ एप्रिल, २०१७

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.